आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१० जुलै २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आरक्षणाच्या मुद्द्यावरून विधिमंडळात गदारोळ, गोंधळातच पुरवणी मागण्या मंजूर /दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब
- घटस्फोटित मुस्लिम महिलांना पतीकडून पोटगी मागण्याचा अधिकार असल्याचं सर्वोच्च न्यायालयाकडून स्पष्ट
- राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ४ टक्के वाढ करण्याचा शासन निर्णय जारी
- तिसऱ्या टी-ट्वेंटी क्रिकेट सामन्यात भारताचं झिम्बाब्वेपुढं विजयासाठी १८३ धावांचं आव्हान

**आणि**

- मराठवाडा आणि विदर्भातल्या काही जिल्ह्यांना भूकंपाचे धक्के

**<><><><><>**

विधिमंडळ अधिवेशनात आजच्या दिवशी आरक्षणाच्या मुद्द्यावरून दोन्ही सभागृहांमध्ये गदारोळ झाला. विरोधक आणि सत्ताधारी पक्षाच्या आमदारांच्या घोषणाबाजीतच दोन्ही सभागृहांमध्ये पुरवणी मागण्या मंजूर करण्यात आल्या. त्यानंतर विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रयत्न करूनही शांतता प्रस्थापित न झाल्यानं विधानपरिषदेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. विधानसभेत काही विधेयकं मंजूर झाली. त्यानंतर विधानसभेचं कामकाजही दिवसभरासाठी थांबवण्यात आलं.

मराठ्यांना ओबीसीमध्ये आरक्षण द्यावं का, यावर विरोधी पक्षानं भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी विधानसभेत केली. सत्ताधारी आक्रमक राहिल्यानं आधी ५ आणि नंतर १० मिनिटांसाठी कामकाज तहकूब झालं. पुन्हा कामकाज सुरू झाल्यावरही सत्ताधारी सदस्यांचा गदारोळ कायम

राहिला. विरोधी पक्षनेते वडेट्टीवार यांना बोलू द्या असं आवाहन, अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केलं. मात्र सत्तारूढ सदस्यांनी जोरदार घोषणाबाजी करत प्रचंड गदारोळ केला. त्यामुळे अध्यक्षांनी कामकाज पुन्हा ४५ मिनिटांसाठी तहकूब केलं.

विधानपरिषदेतही असंच चित्र राहिलं. मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीला विरोधक गैरहजर राहिल्याचा मुद्दा प्रवीण दरेकर यांनी मांडला. त्यावर दोन्ही बाजूंच्या आमदारांनी हौद्यात उतरून प्रचंड गोंधळ आणि घोषणाबाजी केली. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रयत्न करूनही गदारोळ चालूच राहिला.

**<><><><><>**

सरकारनं स्वतःची कातडी वाचवण्यासाठी मराठा आरक्षणावर चर्चा न करता उपसभापतींशी संगनमत करून विधानपरिषदेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब केल्याचा आरोप विधानपरिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला. या मुद्द्यावर चर्चा न करता कामकाज चालू न देणं ही भूमिका चुकीची आहे. सरकारने दोन्ही घटकांशी चर्चा करायला हवी होती, असं मत त्यांनी नोंदवलं.

सभागृहाचं कामकाज तहकूब केल्याच्या विरोधात विरोधी पक्षांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर घोषणाबाजी करत निषेध नोंदवला.

आरक्षणाबाबत सरकारनं निर्णय घेणं अपेक्षित आहे, मात्र निर्णय न घेता सरकार आमच्याकडे बोट दाखवत आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली. सरकारनं ९४ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या, त्याला आम्ही विरोध करू, याची कल्पना आल्यानं त्यांनी सभागृहात गोंधळ घातला, असा आरोपही पाटील यांनी केला.

आरक्षण प्रश्नी सरकारला निर्णय घेता येत नसेल तर सरकारनं पायउतार व्हावं, अशी टीका विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

**<><><><><>**

घटस्फोटित मुस्लिम महिलांना पतीकडून पोटगी मागण्याचा अधिकार आहे, असं सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. घटस्फोटाची याचिका न्यायप्रविष्ट असताना फौजदारी कारवाई संहितेच्या कलम १२५ नुसार आणि घटस्फोट झाल्यानंतर विवाह हक्क संरक्षण कायद्यानुसार मुस्लिम महिलेला पोटगी मागण्याचा अधिकार असल्याचं न्यायालयाने म्हटलं आहे.

सर्वोच्च न्यायालयात एका व्यक्तीनं घटस्फोटित पत्नीला फौजदारी कारवाई संहितेच्या कलम १२५ नुसार हंगामी पोटगी देण्याच्या विरोधात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर न्यायमूर्ती बी.व्ही नागरत्ना आणि ऑगस्टिन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्यावेळी खंडपीठानं मुस्लिम महिलेला पोटगीचा अधिकार असल्याचं स्पष्ट करत सदर याचिका फेटाळून लावली. मुस्लिम महिला अधिनियम १९८६, हा धर्मनिरपेक्ष कायद्यापेक्षा वरचढ होऊ शकत नाही, असंही न्यायालयानं नमूद केलं.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड उद्यापासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर येत आहेत. उद्या संध्याकाळी राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांना ते संबोधित करतील. परवा नरसी मोनजी व्यवस्थापन संस्थेच्या प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांपुढं त्यांचं भाषण होणार आहे.

**<><><><><>**

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ४ टक्के वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. आज हा शासन निर्णय जारी झाला असून, यावर्षीच्या जानेवारी महिन्यापासून ही वाढ मिळणार आहे. या निर्णयाचं राज्य राजपत्रित अधिकारी-कर्मचारी महासंघानं स्वागत केलं आहे.

**<><><><><>**

पाठ्यपुस्तकात केलेला बदल हा फक्त इयत्ता तिसरी आणि सहावी साठीच आहे असं CBSE मंडळानं जाहीर केलं आहे. इतर इयत्तांसाठी मागच्या वर्षी राबवलेला जुनाच अभ्यासक्रम लागू असणार आहे, अशा सूचना शाळांना दिल्याचं मंडळानं म्हटलं आहे.

<><><><><>

हरारे इथं सुरु असलेल्या तिसऱ्या टी-ट्वेंटी क्रिकेट सामन्यात भारतानं झिम्बाब्वेपुढं विजयासाठी १८३ धावांचं आव्हान ठेवलं आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित २० षटकात ४ गडी गमावून १८२ धावा केल्या. कर्णधार शुभमन गिलनं सर्वाधिक ६६ धावा केल्या. ऋतुराज गायकवाडनं २८ चेंडूत ४९, तर यशस्वी जयस्वालनं ३६ धावा केल्या.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा झिम्बाब्वेच्या ११ षटकात ५ बाद ६३ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

मराठवाडा आणि विदर्भातल्या काही जिल्ह्यांना आज सकाळी ७ वाजून १६ मिनिटांनी भूकंपाचे धक्के बसले. साडेचार रिक्टर स्केल तीव्रतेच्या या भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यात, कळमनुरी तालुक्यातल्या रामेश्वर तांडा गावात होता. भूकंपामुळे कोणतीही जीवीत अथवा वित्त हानी झाली नाही. छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली आणि वाशिम इथंही भूकंपाचे धक्के जाणवले. नागरिकांनी घाबरून न जाता सतर्कता बाळगावी, असं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

दरम्यान, भूकंपाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन आणि आपत्ती निवारण यंत्रणेला सतर्क राहण्याचे निर्देश दिल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.

<><><><>

वरळी हिट अँड रन प्रकरणातला आरोपी मिहीर शहाचे वडील राजेश शहा यांना शिवसेनेतून काढून टाकलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत ही घोषणा केली. या दुर्घटनेत मरण पावलेल्या महिलेच्या कुटुंबाप्रति सहवेदना व्यक्त करतानाच मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून दहा लाख रुपयांचं अर्थसहाय्य त्यांनी जाहीर केलं.

दरम्यान शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी आज मृत महिलेच्या पतीची भेट घेऊन सांत्वन केलं. हा खटला जलदगती न्यायालयात चालवावा अशी मागणी करत त्यांनी याप्रकरणी राजकीय हस्तक्षेप होत असल्याचा आरोप केला.

याप्रकरणी आतापर्यंत आरोपी मिहीर शहा समवेत १२ जणांना अटक झाली असून त्याचे वडील राजेश शहा सध्या जामिनावर आहेत. पोलीस तपास सुरु आहे.

<><><><>

नांदेड जिल्ह्याचे रहिवासी असलेले बीएसएफ जवान कामेश विठ्ठलराव कदम यांना काल हरयाणा इथं कर्तव्यावर असताना वीरमरण आलं. ते ४२ वर्षांचे होते. कर्तव्य बजावत असताना त्यांना हृदयविकाराचा धक्का आला. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं. उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

<><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ४२७ अंकाची घसरण झाली आणि तो ७९ हजार ९२५ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीमधे १०९ अंकांची घसरण होऊन तो २४ हजार ३२४ अंकांवर बंद झाला.

<><><><>

गडचिरोली जिल्ह्यात ट्रक आणि गाडीची धडक होऊन झालेल्या अपघातात दोन ठार तर तिघं जखमी झाले. हा अपघात आज पहाटे पाचच्या सुमारास झाला.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१० जुलै २०२४ - बुधवार

**<><><><><>**

गोव्यात पेडणे इथं अतिवृष्टीमुळे बोगद्यात पाणी शिरल्यानं कोकण रेल्वे मार्गावरच्या अनेक गाड्या आज रद्द करण्यात आल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरून मडगावला जाणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेस, जनशताब्दी एक्सप्रेस, मांडवी एक्सप्रेस तसंच, मंगळुरू एक्सप्रेस या गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी आणि मराठवाड्यात  काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी जोरदार पावसासह मेघगर्जना आणि विजांचा कडकडाट होऊ शकतो. विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडेल असं पुणे वेधशाळेच्या हवामानवृत्तात म्हटलं आहे.

**//<><><><><>//**